# अर्थ विभाग

## १३ वा वित्त आयोग

केंद्रीय आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थाना बळकटीकरणासाठी अनुदान देण्यात येते. १३ व्या वित्त आयोगाचा प्रारंभ १ एप्रिल २०१० पासुन झाला असुन आयोगाचा कालखंड एप्रिल २०१० ते मार्च २०१५ असा आहे. १३ व्या वित्त आयोगातंर्गत राज्याला प्राप्त होणारा निधी जनरल बेसिक ग्रेन्ट, जनरल परफॉर्मन्स ग्रँन्ट, व स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रॅन्टच्या स्वरुपात सन २०११-२०१२ पासून प्राप्त होणारा निधी आयोगाने विहीत केलेल्या अटीची पुर्तता झाल्यानंतरच मिळणार आहे.

## अ) निधी वितरणाचे प्रमाण

| **अ.क्रं.** | **पंचायत राज संस्था** | **निधी वाटपाचे प्रमाण** |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद स्तर | १०% |
| २ | पंचायत समिती स्तर | २०% |
| ३ | ग्राम पंचायत स्तर | ७०% |
| | **एकुण** | **१००%** |

## ब) निधी वितरणाचे निकष

जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत स्तरासाठी एकत्रित जनरल बेसिक ग्रेन्ट व जनरल परफॉर्मन्स ग्रँन्ट वाटपाचे निकष.

| अं.क्रं. | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | जिल्हयाची लोकसंख्या | ५०% |
| २ | जिल्हयाचे ग्रामीण क्षेत्रफळ | २०% |
| ३ | उच्चतम दरडोई उत्पन्नापासुनची तफावत | १०% |
| ४ | जिल्हयाच्या ग्रामीण भागातील अनु.जाती/ जमाती लोकसंख्येचे प्रमाण | १०% |
| ५ | वित्त आयोगाचे निधीच्या खर्चाचे प्रमाण | ०५% |
| ६ | सुधारीत नमुन्यात लेखे ठेवण्याची अंमलबजावणी (प्रियासॉप्ट) | ०५% |
| | **एकुण** | **१००%** |

**जिल्हा परिषद स्तरावरुन पंचायत समित्यांसाठी जनरल बेसिक ग्रॅन्ट व जनरल परफॉर्मन्स ग्रॅन्ट वाटपाचे निकष.**

| अं.क्रं. | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | पंचायत समिती क्षेत्राची लोकसंख्या | ४०% |
| २ | पंचायत समितीचे क्षेत्रफळ | २०% |
| ४ | पंचायत समितीतील अनु.जाती/ जमाती लोकसंख्येचे प्रमाण | १०% |
| ५ | वित्त आयोगाचे निधीच्या खर्चाचे प्रमाण | ०५% |
| ६ | सुधारीत नमुन्यात लेखे ठेवण्याची अंमलबजावणी (प्रियासॉप्ट) | ०५% |
| ७ | यशवंत पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी | ०५% |
| ८ | पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजनेत सहभागी ग्रा. पं. टक्केवारी | १५% |
| | **एकुण** | **१००%** |

**जिल्हा परिषद स्तरावरुन ग्राम पंचायतीसाठी जनरल बेसिक ग्रॅन्ट व जनरल परफॉर्मन्स  ग्रॅन्ट वाटपाचे निकष.**

| अं.क्रं. | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ग्राम पंचायतीची लोकसंख्या | ४०% |
| २ | ग्राम पंचायतीतील अनु.जाती/ जमाती लोकसंख्येचे प्रमाण | १०% |
| ३ | वित्त आयोगाचे निधीच्या खर्चाचे प्रमाण | १०% |
| ४ | पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजनेची अंमलबजावणी | १५% |
| ५ | प्लॅन प्लस सॉप्टवेअरचा वापर | ०५% |
| ६ | यशवंत पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी | ०५% |
| ७ | सुधारीत नमुन्यात लेखे ठेवण्याची अंमलबजावणी (प्रियासॉप्ट) | १०% |
| ८ | ग्राम रचना आराखडा मंजूर असलेल्या ग्रामपंचायती (D.P.Plan) | ०५% |
| | **एकुण** | **१००%** |

## क) तेराव्या वित्त आयोगाच्या वितरीत निधीमधुन ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषदेने करावयाच्या बाबी.

१) ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषदेच्या मत्तांची देखभाल व दुरुस्ती.

२) अंतर्गत गटारे व रस्ते गावांना जोडणारे रस्ते व इतर मार्ग इ. बांधकाम व देखभाल दुरुस्ती

३) ग्राम पंचायत कार्यालय व ग्रामसचिवालय बांधकाम, देखभाल दुरुस्ती

४) पंचायत समिती/जिल्हा परिषद स्तरावरुन अनुक्रमे क वर्ग व ब वर्ग दर्जा तिर्थक्षेत्राची देखभाल दुरुस्ती

५) दहन व दफनभुमी देखभाल दुरुस्ती

६) आरोग्य, ग्राम स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाची निगडीत कामे.

७) घनकचरा प्रक्रियेसाठी पर्यावरण संतुलीत तंत्रज्ञान वापरुन शास्त्रीय पध्दतीने कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे.

## ड) पंचायत राज संस्थासाठी राज्य स्तरावरुन हाती घ्यावयाच्या सामाईक बाबी.

१) प्रिया सॅाप्टवेअर (PRIA soft)

२) आय.एस.ओ. प्रमाणीकरण

३) बायोमेट्रीक्स

४) नोडल हॅड होल्डींग एजंन्सी

5) e-PRI ची अंमलबजावणी

६) सौरऊर्जा

७) आपत्ती व्यवस्थापन

८) पंचायत राज संस्थाना सोई सुविधा

९) पंचायत राज संस्थामार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार व प्रसार

१०) पंचायत राज संस्थांच्या सर्व स्तरावर महिला शक्ती अभियान राबविण्यासाठी पुरक

**तरतूदी.**

**नियोजन व अंमलबजावणीमध्ये सुःसुत्रता व एकसुत्रीपणा राहणेसाठी निधीचे नियोजन व नियंत्रण राज्य स्तरावरुन करण्यात येते.**